# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांकः07.07.2025** **वारःसोमवार**

1. ब्राझीलमध्ये ब्रिक्स शिखर परिषदेला सुरुवात; सर्वसमावेशक जागतिक व्यवस्था तयार करण्यावर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा भर
2. मुख्यमंत्र्यांच्या महाराष्ट्रधर्म पॉडकास्ट मालिकेचा आरंभ; पहिल्या भागातून घेतला राज्याच्या वैभवशाली संस्कृतीचा धांडोळा
3. राज्यात भक्तिमय वातावरणात आषाढी एकादशी साजरी आणि
4. अँडरसन-तेंडूलकर चषक कसोटी क्रिकेट मालिकेतल्या दुसऱ्या सामन्यात भारताचा इंग्लंडवर 336 धावांनी ऐतिहासिक विजय

**पंतप्रधान-ब्रिक्स**

सर्वसमावेशक आणि बहुध्रुवीय जागतिक व्यवस्था तयार करण्याची आग्रही भूमिका पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काल ब्रिक्स शिखर परिषदेत मांडली. ब्राझीलमधील रिओ दि जानेरो इथं सुरू असलेल्या ब्रिक्स शिखर परिषदेच्या पहिल्या सत्रात ते बोलत होते. सर्वसमावेशक जागतिक व्यवस्थेसाठी जागतिक संस्थांमध्ये व्यापक सुधारणा कराव्या लागतील; धोरण निर्मितीमध्ये ग्लोबल साऊथलाही प्राधान्य द्यावं लागेल असं पंतप्रधान मोदी म्हणाले. संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषद, जागतिक व्यापार संघटना आणि यासारख्या अन्य संस्थांमध्ये सुधारणांसाठी संकल्प करण्याचं आवाहन त्यांनी सदस्य देशांना केलं.

**सीएम पॉडकास्ट**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल आषाढी एकादशीचं औचित्य साधून 'महाराष्ट्रधर्म' या आपल्या विशेष पॉडकास्ट मालिकेचा प्रारंभ केला. नवमाध्यमात लोकप्रिय असलेल्या पॉडकास्टच्या या माध्यमातून ते जनतेशी संवाद साधणार आहेत. प्रसिद्ध विचारवंत, संत साहित्याचे अभ्यासक-लेखक डॉ. सदानंद मोरे यांनी ही मुलाखत घेतली आहे. या पॉडकास्टच्या पहिल्या भागात मुख्यमंत्र्यांनी रामायणापासून ते महाभारतापर्यंत, जगाला दुःखातून मुक्त होण्याचा मार्ग दाखवणाऱ्या गौतम बुद्धांपासून ते भक्ती संप्रदायातील संतांपर्यंत तसंच महाराष्ट्राची अध्यात्मिक पायाभरणी आणि उभारणी या विषयांवर अभ्यासपूर्ण मांडणी केली. शेकडो वर्षांची परंपरा असलेल्या राज्यातल्या वारीच्या प्रथेबद्दल बोलताना मुख्यमंत्री म्हणाले....

**नम्रता आणि श्रद्धा यावर आधारलेली वारीची परंपरा आली. ती कदाचित मागे पुढेच आली किंवा एकत्रितच आली. जगात क्वचितच अशी यात्रा घडत असेल जी प्रतिवर्षी न चुकता, भक्तीवर आधारित असलेली वारी सामाजिक समतेचा झरा बनली. वारीला जातीत थारा नाही. वर्ण अभिमान विसरली जाती. ही वारी कोणतं इव्हेंट नाही. ही चालती बोलती संस्कृती आहे. एक अखंड स्मूर्ती आहे जी महाराष्ट्राचा आत्माभिमान जपते. हजारो वर्षापूर्वी परकीय आक्रमणाला न जुमानता चिझियाकराचा जाच न बाळगता पावले विठुरायाकडे जात वारी ना इस्लामी राजवटीत थांबली ना इंग्रजी आक्रमणात.**

**आषाढी एकादशी**

देवशयनी अर्थात आषाढी एकादशी काल संपूर्ण राज्यभरात भक्तिमय वातावरणात साजरी करण्यात आली. या निमित्त राज्यातल्या विठ्ठल मंदिरांमध्ये प्रथेनुसार महापूजा, अभिषेक, भजन, कीर्तन अशा धार्मिक कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं होतं, आषाढी एकादशी निमित्त सर्वच विठ्ठल मंदिरांवर आकर्षक रोषणाई, फुलांची सजावट करण्यात आली होती. त्याचबरोबर प्रती-पंढरी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या गावोगावच्या मंदिरांमध्ये लाडक्या विठूरायाचं दर्शन घेण्यासाठी भाविकांच्या रांगा लागल्या होत्या.

पंढरपुरी वैष्णवांचा मेळा जमला असताना याच शहरात अरिहंत पब्लिक स्कूलनं आयोजित केलेल्या 'टेक वारी' या आगळ्या-वेगळ्या उपक्रमाचं उद्घाटन उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दूरस्थ पद्धतीनं केलं. विद्यार्थ्यांशी थेट संवाद साधत शिंदे यांनी त्यांच्याकडून प्रकल्पांची माहिती घेतली. सांगलीच्या विठ्ठल-रुक्मिणी मंदिरात धार्मिक कार्यक्रमांबरोबरच शालेय विद्यार्थ्यांनी पारंपारिक वेशभूषेत दिंडी सोहळा साजरा केला. तर सांगलीवाडी इथं 'माझं शिवार पंढरी' हे कवीसंमेलन उत्साहात पार पडलं.

अहिल्यानगर जिल्ह्यातील पारनेर तालुक्यातील पळशी इथल्या पुरातन विठ्ठल मंदिरातही भाविकांनी दर्शनासाठी गर्दी केली होती. शिर्डीतल्या श्री साईबाबा संस्थानाच्या वतीनंही आषाढी एकादशी निमित्त भाविकांना महाप्रसादाचं वाटप करण्यात आलं. राज्याच्या सर्वच भागात 'अभंगवाणी' सारख्या कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं होतं.

**मोहरम**

देशाच्या तसंच राज्याच्या विविध भागात काल अशूरा-ए-मुहर्रम पाळण्यात आला. प्रेषित मोहम्मद पैगंबरांचे नातू हजरत इमाम हुसैन आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी सत्य आणि न्यायासाठी करबाला इथं दिलेल्या बलिदानाची आठवण म्हणून हा दिवस पाळला जातो. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी यानिमित्तानं या बलिदानाचं स्मरण करून, यातून लोकांना बिकट परिस्थितीत सत्याच्या बाजूनं उभं राहण्याची प्रेरणा मिळते असं समाजमाध्यमावरील संदेशात म्हटलं. या निमित्तानं ठिकठिकाणी पारंपरिक पद्धतीनं ताबूतांच्या विसर्जन मिरवणुका काढण्यात आल्या.

**सरन्यायाधीश**

देशाचे सरन्यायाधीश न्यायमूर्ती भूषण गवई यांनी काल मुंबईत गिरगाव इथल्या चिकित्सक समूह शिरोळकर विद्यालयाला भेट देऊन आपल्या बालपणीच्या आठवणींना उजाळा दिला. मातृभाषेतून शिक्षण घेतल्यामुळे विषयांची समज अधिक पक्की होते, शिक्षणाबरोबरच संस्कारही रुजतात, हेच संस्कार आयुष्यभर साथ देतात, असा आत्मविश्वासही गवई यांनी यावेळी विद्यार्थ्यांना दिला.

**गडकरी**

पिकांचं उत्पादन वाढवण्यासाठी कृत्रिम बुद्धिमत्ता आणि अत्याधुनिक शेती तंत्रज्ञानाचा वापर लाभदायक ठरेल, असं प्रतिपादन केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी काल केलं. ऊसशेतीसाठी कृत्रिम तंत्रज्ञान या विषयावर नागपूरमध्ये एग्रोव्हीजन फाऊंडेशनने आयोजित केलेल्या विशेष कार्यशाळेत गडकरी यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी त्यांनी उपस्थितांशी संवाद साधला.

**सहकार रॅली-सोलापूर**

आंतरराष्ट्रीय सहकार दिनानिमित्त काल सोलापूरात सहकार फेरीचं आयोजन करण्यात आलं होतं. जिल्हा उपनिबंधक किरण गायकवाड आणि जिल्हा बँकेचे प्रशासक कुंदन भोळे यांच्या हस्ते या फेरीचा आरंभ करण्यात आला. यंदाचं म्हणजे 2025 हे वर्ष आंतरराष्ट्रीय सहकार वर्ष म्हणून साजरं करण्यात येत आहे. 5 जुलैला आंतरराष्ट्रीय सहकार दिन साजरा केला जातो; तर 6 जुलै हा केंद्रीय सहकार मंत्रालयाचा स्थापना दिवस आहे. या तिन्ही गोष्टींचं औचित्य साधून या सहकार फेरीचं आयोजन करण्यात आलं होतं.

**तुरुंग पर्यटन-सिंधुदुर्ग**

सावंतवाडी इथलं संस्थानकालीन कारागृह 150 वर्षे जुनं आहे. त्यामुळे त्या ठिकाणी 'कारागृह पर्यटनाची' संकल्पना राबवता येऊ शकेल, असं मत माजी मंत्री आणि आमदार दीपक केसरकर यांनी व्यक्त केलं आहे. ते काल सावंतवाडी इथं पत्रकारांशी बोलत होते. काही दिवसापूर्वी या कारागृहाची भिंत कोसळल्यानं तूर्तास त्या ठिकाणी असलेल्या सर्व बंदीजनांना सिंधुदुर्गनगरी इथल्या कारागृहात हलविण्यात आलं आहे. तिथली जागा पुरेशी आहे. त्यामुळे डागडुजीनंतर पुढे हा सकारात्मक निर्णय घेता येऊ शकतो, अशी भूमिका केसरकर यांनी मांडली.

**दुर्घटना- गडचिरोली**

गडचिरोली जिल्ह्याच्या कुरखेडा तालुक्यातील शिरपूर इथं शेततळ्यात आंघोळ करण्यासाठी गेलेल्या दोन मुलांचा बुडून मृत्यू झाला. काल सकाळी 10 वाजताच्या सुमारास ही दुर्घटना घडली.

**क्रिकेट**

अँडरसन-तेंडूलकर चषक स्पर्धेत इंग्लंडमधल्या बर्मिंगहॅम इथं झालेला दुसरा कसोटी क्रिकेट सामना भारताने 336 धावांनी जिंकून ऐतिहासिक कामगिरी केली आहे. या विजयामुळे भारताने मालिकेत 1-1 बरोबरी साधली आहे. धावांचा विचार करता भारताचा हा परदेशातील सर्वांत मोठा विजय ठरला आहे. भारताने प्रथमच कसोटीत 1 हजार पेक्षा धावा केल्या आहेत. काल सामन्याच्या पाचव्या आणि शेवटच्या दिवशी इंग्लंडने 3 बाद 72 धावांवरून डाव सुरू केल्यानंतर विजयासाठी 608 धावांचं उद्दिष्ट गाठताना यजमान संघाचा

डाव 271 धावांवर आटोपला. आकाशदीपने दुसऱ्या डावात 6 बळी घेत या कसोटीत एकंदर 10 बळी घेतले. कर्करोगाने ग्रस्त असलेल्या आपल्या बहिणीला हा विजय समर्पित करत असल्याचं आकाशदीपने सामन्यानंतर बोलताना सांगितलं. या सामन्यात दोन शतक ठोकणाऱ्या कर्णधार शुभमन गिल याला सामनावीर पुरस्काराने गौरविण्यात आले. कोणत्याही आशियाई संघाने बर्मिंगहॅममध्ये कसोटी जिंकण्याची ही पहिलीच वेळ आहे. या मालिकेतला तिसरा कसोटी सामना येत्या 10 जुलैपासून लंडनमधल्या लॉर्ड्स मैदानावर होणार आहे.

**तलवारबाजी-नाशिक**

नाशिक इथं आयोजित सातव्या चाईल्ड कप तलवारबाजी स्पर्धेत मुलांच्या सेबर प्रकारात महाराष्ट्राच्या श्रीराज पोळ यानं काल सुवर्णपदक पटकावलं. अंतिम लढतीत त्यानं तामिळनाडूच्या ए. एस. जोसेफ याचा 11-8 असा पराभव केला. याच प्रकारात महाराष्ट्रच्याच अरोह जाधव आणि पंजाबच्या हेयांश गर्ग यांना संयुक्तपणे कास्य पदक मिळालं.

**पाऊस-पालघर, नाशिक**

पालघर जिल्ह्यात अनेक भागांत काल दिवसभर जोरदार पाऊस सुरू होता. संततधार पावसामुळे जिल्ह्यातल्या धरणांच्या पाणी पातळीत वाढ झाली असून सूर्या प्रकल्पाच्या धामणी धरणाचे पाचही दरवाजे काल उघडण्यात आले. धामणी आणि कवडास या धरणांमधून पाण्याचा विसर्ग सुरू करण्यात येत असून नदीकाठच्या गावांना सावधानतेचा इशारा देण्यात आला आहे.

नाशिक शहरासह जिल्ह्यातही पावसाची संततधार सुरूच असल्यानं गंगापूर धरणातून विसर्ग वाढवण्यात आला आहे. नाशिक जिल्ह्यातील नऊ धरणांमधून काल विसर्ग सुरू होता. त्र्यंबकेश्वर इथला दुगारवाडी धबधबा पाहण्यासाठी गेलेल्या दहा ते पंधरा पर्यटकांना याच परिसरात पावसामुळे अडकून राहावं लागलं; मात्र जिल्हा प्रशासनाने त्यांची सुरक्षित सुटका केली. त्रंबकेश्वर तालुक्यातील तळवाडे इथं तलावात बुडून एका युवकाचा मृत्यू झाला आहे.

**हवामान**

येत्या 24 तासात कोकण आणि विदर्भात बहुतांश ठिकाणी, तर मध्य-महाराष्ट्र आणि मराठवाड्यात बऱ्याच ठिकाणी पावसाची शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे.

# आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं, नमस्कार.